दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक),नयनिश गोळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा || श्री नागनाथ कृपा || प्रो.प्रा.यमपुरे अशोक 8014842121

सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स

CHEMIST & DRUGIST

शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातूर,बार्शी,सोलापूर,नगर येथील मेडिसिन मिळेल

सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील

मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

मुंबई || वर्ष २३ || अंक २२४ || रविवार २८ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## बनावट प्रमाणपत्राबाबत घेणारे, देणारे अशा दोघांवरही कायदेशीर कारवाई – राज्यपाल

पुणे – देशाला आत्मनिर्भर बनवताना दिव्यांगांना स्वयंपूर्ण बनवणे आवश्यक आहे. सामान्य आणि सक्षम व्यक्ती चुकीच्या पद्धतीने दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून सेवेत प्रवेश करणार नाही याबद्दल दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना जागरूक राहावे लागेल. बनावट पद्धतीने दिव्यांग प्रमाणपत्र घेणारे आणि देणारे अशा दोघांवरही कायदेशीर कारवाई केली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका राज्यपाल रमेश बैस यांनी मांडली.दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत 'सार्थक एजुकेशन ट्रस्ट' या संस्थेच्या १६व्या स्थापना दिवस कार्यक्रमात बैस बोलत होते.

मुंबईतील जागतिक व्यापार केंद्र येथे झालेल्या कार्यक्रमावेळी सेवानिवृत्त केंद्रीय सचिव लव वर्मा, सिडबीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप वर्मा, सार्थकच्या सल्लागार मंडळाचे सदस्य क्रिशन कालरा व जागतिक व्यापार केंद्राचे अध्यक्ष विजय कलंत्री उपस्थित होते.

## रेणुका ईश्वर करनुरे... पूजा खेडकरनंतर पुण्यात आणखी एका बनावट आयएएस अधिकारीचा धुमाकूळ

पुणे – वादग्रस्त आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर यांचे प्रकरण सध्या राज्कर चांगलेच गाजत आहे. पूजा खेडकर यांच्या कारनाम्यानंतर आता पुण्यात आणखीन एक बनावट आयएएस अधिकारी धुमाकूळ घालत आहे. रेणुका ईश्वर करनुरे असे बनावट आयएएस अधिकाऱ्याचे नाव आहे.

पुण्यातील वडकी परिसरात राहणाऱ्या रेणुका ईश्वर करनुरे या महिला आयएएस अधिकारीने परिसरातील अनेक महिलांना व्याजाने पैसे दिले. रेणुका दरमहा दहा रुपये टक्क्याने पैसे उकळत आहे.

या प्रकरणी रेणुका विरोधात एका ३१ वर्षे महिलेने लोणी काळभोर पोलिसात अवैध सावकारकीचा गुन्हा दाखल केला आहे. ३१ वर्षे पीडित महिलेला बनावट आयएएस अधिकारी रेणुका हिने दोन लाख ६८ हजार रुपये व्याजाने दिले होते. या बदल्यात पीडित ने रेणुका यांना आतापर्यंत तीन लाख ४८ हजार रुपये पर्यंत दिले असताना सुद्धा बनावट आयएएस अधिकारी रेणुका हिने आणखीन चार लाख ५५ हजार रुपयाची मागणी करत त्रास देत धमकावत असल्याचा आरोप तक्रारदार



महिलेने केले आहे.

मी आय एस अधिकारी आहे माझ्या नादीला लागू नको तुला कामाला लावेल, माझे पैसे तू ताबडतोब दे म्हणत धमकवण्यास सुरुवात केली असल्याचे पिडीत महिलेने तक्रारीत म्हंटले आहे. या सगळ्या त्रासानंतर पीडित महिलेने लोणी काळभोर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी आता बनावटा आयएस अधिकारी रेणुका ईश्वर करनुरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून रेणुका हिच्या अनेक भानगडी आता समोर येणार आहेत. वादग्रस्त आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबीयांच्या कंपनीचा लिलाव होण्याची शक्यता

वादग्रस्त आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर यांच्या कुटुंबीयांच्या कंपनीचा लिलाव होण्याची शक्यताय...पिंपरीतील थर्मोव्हेरीटा कंपनीने २ लाख ७२ हजारांचा कर अद्यापही भरला नाहीये...आधीच जप्तीची कारवाई केलेल्या या कंपनीचा लिलाव होऊ शकतो,

अशी माहिती करसंकलन विभागाचे प्रमुख निलेश देशमुख यांनी दिलीय...याच कंपनीचा पत्ता पूजा खेडकर यांनी दिव्यांग प्रमाणपत्रासाठी वायसीएम रुग्णालयाला रेशनकार्ड मार्फत दिला होता...त्यामुळे आता या कंपनीवर लिलावाची कारवाई होण्याची शक्यताय...यामुळे खेडकरांच्या अडचणीत वाढ होणाराय.

## पुणेकर एकाचवेळी डेंग्यू, चिकुनगुनिया अन् झिकाच्या विळख्यात!

पुणे – पुणे शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच आहे. या महिन्यात डेंग्यूचे एकूण ३८९ संशयित रुग्ण आढळले आहेत. पावसाळा सुरू झाल्यामुळे डेंग्यूच्या रुग्णांचे प्रमाण वाढू लागले आहे. याचबरोबर चिकुनगुनियाचेही ८ रुग्ण आढळून आले आहेत.

शहरात या महिन्यात डेंग्यूचे ३८९ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील ११ जणांना डेंग्यूचे निदान झाले आहे. गेल्या महिन्यात संशयित रुग्णांची संख्या १५७ होती आणि निदान झालेला केवळ १ रुग्ण होता. जानेवारी ते मे या कालावधीत दरमहा संशयित रुग्णांची संख्या १०० पेक्षा कमी होती. जानेवारी ९६, फेब्रुवारी ७५, मार्च ६४, एप्रिल ५१ आणि मे ४४ अशी रुग्णसंख्या होती. त्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर जून महिन्यापासून मोठी वाढ झालेली आहे. शहरात या वर्षभरात डेंग्यूचे ८७६ संशयित रुग्ण आढळले असून, निदान झालेले २१ रुग्ण आहेत. यंदा शहरात चिकुनगुनियाचे १८ रुग्ण आढळले आहेत. त्यात फेब्रुवारी ५, मार्च ४, जून १ आणि आता जुलैमध्ये ८ रुग्ण आढळले आहेत. शहरात हिवतापाचा यंदा एकही रुग्ण आढळून आलेला नसल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आले आहे.पावसाळा सुरू असल्याने डासांचे प्रमाण वाढले असून, त्यांच्या माध्यमातून पसरणारे संसर्गजन्य रोगही वाढले आहेत. यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून डासोत्पत्ती स्थाने शोधून नष्ट करण्याचे काम सुरू आहे. यंदा डासोत्पत्ती स्थाने आढळल्याप्रकरणी १ हजार १७४ घरमालकांना नोटिसा बजावून त्यांच्याकडून ४ लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# लग्नाला ५७ वर्षे, पतीने पत्नीचे केले ५७ तुकडे; कारणही धक्कादायक

पाटणा : एका सेवानिवृत्त शिक्षकाने त्याच्या पत्नीची निर्घृण हत्या केली आहे. त्यांच्या लग्नाला ५७ वर्षे झाली. इतक्या वर्षांनंतर पत्नीने पतीला असं काही सांगितलं की त्याने तिचे ५७ तुकडे केले.

बिहारच्या अरवाल जिल्ह्यातील ही धक्कादायक घटना आहे.जमुरी गावातील हे प्रकरण. ७६ वर्षीय सेवानिवृत्त शिक्षक बिरबल प्रसादची पत्नी सुमती सिन्हाची हत्या केली आहे. आरोपी बिरबलने कुटुंबातील इतर सदस्यांना खोलीत बंद करून हे कृत्य केल्याचं सांगितलं. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मुलगा खासगी शाळेतून घरी आला असता घरात रक्त पाहून आरडाओरडा करू लागला. यादरम्यान बिरबलने सून आणि नातवासह गावकऱ्यांना हातात धारदार शस्त्र घेऊन धमकावण्यास सुरुवात केली.

लग्नाला ५७ वर्षे, पत्नीचे केले ५७ तुकडे

या घटनेची माहिती मिळताच मेहंदिया पोलिसांनी घटनास्थळ गाठून मारेकऱ्याला अटक केली. पोलिसांनी घटनास्थळावरून धारदार शस्त्र जप्त केलं आहे. या संदर्भात एसपी राजेंद्र कुमार भील यांनी सांगितलं की, सेवानिवृत्त शिक्षक बिरबल प्रसाद



याला अटक करण्यात आली असून त्याने पत्नीचे ५७ तुकडे केल्याचा दावा केला आहे. त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

आरोपी बिरबल प्रसादने सांगितलं, लग्नाला ५७ वर्षे झाली होती, त्यामुळे त्याने पत्नीचे एकूण ५७ तुकडे केले. पोलिसांनी सांगितलं की, मृतदेहाचे सुमारे १२ तुकडे करून विच्छेदन करण्यात आलं होतं. या घटनेची संपूर्ण गावात चर्चा सुरू आहे.लग्नाच्या ५७ वर्षांनंतर पत्नीने ते सत्य सांगितल्याने हत्या

बिरबलची पत्नी सुमतीने आपल्या काकांशी अवैध संबंध होते असं सांगितलं. त्यानंतर बिरबल संतापला. तिचे काका ८ वर्षांपूर्वी वारले. तरी या अवैध संबंधाची माहिती मिळताच बिरबलने रागाच्या भरात सुमतीची धारदार शस्त्राने हत्या केली.लव्ह मॅरेजनंतर ६ महिन्यातच केले तुकडेजून २०२४ मध्ये समोर आलेली उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगरमधील ही धक्कादायक घटना. अरबाज नावाचा तरुण. सहा महिन्यांपूर्वीच उत्तराखंडमधील २१ वर्षीय चाहत नावाच्या तरुणीसोबत त्याने प्रेमविवाह केला होता. घरच्यांना काहीही न सांगता तो भाड्याच्या खोलीत राहू लागला. या काळात त्याने अनेक वेळा खोल्या बदलल्या. पण त्यानंतर अरबाजने चाहतची धारदार शस्त्राने हत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पत्नीचा निर्घृणपणे शिरच्छेद केल्यानंतर आरोपीने तिचे हातही कापले होते. मृतदेहाचे अनेक तुकडे केले.

असा झाला हत्येचा उलगडा

पोलीस अधीक्षक सत्यनारायण प्रजापती यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं की, अरबाजने त्याचा मित्र शाहरुखच्या मदतीने बाईकवरून काली नदीत मृतदेह फेकून दिला होता. मात्र नदीत मोठ्या प्रमाणात जलकुंभ वाढला होता.

अनेक दिवस मृतदेह नदीतील जलकुंभात अडकून राहिला आणि पुढे सरकत नव्हता. आठवडाभरानंतर आरोपी पती त्याच्या मित्रासोबत हा मृतदेह तिथून काढण्यासाठी पोहोचला. तेव्हाच पोलीसही तिथे पोहोचले आणि त्याला जागीच पकडलं. मात्र, त्याचा मित्र शाहरुख तिथून पळून गेला. चौकशीत आरोपी पतीने पोलिसांसमोर खुनाची कबुलीही दिली. तरुणाच्या माहितीवरून पोलिसांनी हत्या ज्या शस्त्राने केली होती, ते जप्त केलं.पत्नीच्या दैनंदिन खर्चाला वैतागला हत्येमागचे कारण समजू शकलं नाही, मात्र चौकशीदरम्यान आरोपीने पोलिसांना सांगितलं की, चाहत अतिशय उद्धट होती. तिच्या दैनंदिन खर्चावरून दोघांमध्ये अनेकदा भांडणं झाली होती. यानंतर अरबाजने मित्राच्या मदतीने तिची हत्या केली.

## सोन्याच्या शिक्क्यावर झळकला शाहरुख खान

पॅरिस: पॅरिसमधील गेर्विन म्युझियमने बॉलीवूड सुपरस्टार अभिनेता शाहरुख खानला सोन्याची नाणी देऊन सन्मानित केलं आहे.

बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान (आजही प्रेक्षकांना भुरळ घालतो. फक्त बॉलीवूडच नव्हे तर परदेशात ही अभिनेता शाहरुख खानचे करोडो चाहते आहे.

नुकताच किंग खानचा एक मोठा सन्मान करण्यात आला आहे. पॅरिसमधील गेर्विन म्युझियमने बॉलीवूड सुपरस्टार अभिनेता शाहरुख खानला सोन्याची नाणी देऊन सन्मानित केलं आहे. सोन्याच्या नाण्यावर झळकणारा हा पहिला भारतीय अभिनेता आहे.

शाहरुख खान युनिव्हर्स क्लबने आपल्या ट्विटर अकाऊंटवर याबद्दलची माहिती फोटोद्वारे शेअर केली आहे. सध्या सोशल मीडियावर सर्वाधिक किंग खानच्या सोन्याच्या नाण्यावरचा फोटो पाहायला मिळत आहे.

पॅरिसमधील गेर्विन म्युझियम हे ग्रँडस बुलेव्हार्डस्वर असलेले मेणाचे संग्रहालय आहे. २००८ मध्ये इथे किंग खानचा मेणाचा पुतळा बनवण्यात आला होता. त्याचबरोबर युके, जर्मनी, भारत, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलियातील संग्रहालयात शाहरुख खानचे वॅक्स स्टॅच्यू आहेत. इतकेच नव्हे तर,

शाहरुख खानचे वेगवेगळ्या देशात एकूण १४ स्टॅच्यू बनवण्यात आले आहेत.

## राहुल यांचा नवा पत्ता... ५; सुनहरी बाग

नवी दिल्लीतील ५, सुनहरी बाग हा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा नवा पत्ता असण्याची शक्यता आहे. आपल्या निवासस्थानासाठी त्यांनी ५, सुनहरी बाग या बंगल्याची निवड केल्याची माहिती आहे.आज प्रियांका गांधी वाड्रा आणि राहुल गांधी यांच्या सहकाऱ्यांनी या बंगल्याची पाहणी केली. हा बंगला काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी

यांचे निवासस्थान १०, जनपथ तसेच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या १०, राजाजी मार्ग बंगल्यापासून काही मिनिटांच्या अंतरावर आहे.

राहुल गांधी यांनी मोदी आडनावांवरून केलेल्या टीकेमुळे मानहानीच्या प्रकरणात सुरतच्या कनिष्ठ न्यायालयाने त्यांना २३ मार्च २०२३ रोजी दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यापाठोपाठ दुसऱ्याच दिवशी त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले होते आणि त्यांना १२, तुघलक लेन बंगला सोडण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार राहुल गांधी यांनी २२ एप्रिल रोजी हा बंगला सोडला. ते काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या १०, जनपथ या निवासस्थानी राहण्यास गेले होते. सूरत न्यायालयाच्या निकालाविरोधात काळात राहुल गांधी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिल्यामुळे त्यांचे लोकसभेचे सदस्यत्व कायम राहिले. त्यांना पुन्हा १२, तुघलक लेन बंगला देऊ करण्यात आला.

१२, तुघलक लेन बंगल्यात राहुल गांधी खासदार म्हणून २००४ पासून १९ वर्षे राहिले. पण तो बंगला पुन्हा घ्यायचा नाही असे ठरवून त्यांनी २०२३ च्या उत्तरार्धात ओसाड पडलेल्या ७, सफदरजंग लेन बंगल्याचीही पाहणी केली होती.

पण वेळेत दुरुस्ती शक्य नसल्यामुळे त्यांनी त्याचाही नाद सोडून दिला. अठराव्या लोकसभेवर पुन्हा निवडून आल्यानंतर राहुल गांधी यांनी पुन्हा सफदरजंग लेन भागात वास्तव्यासाठी स्वारस्य दाखवले होते. पण आता त्यांनी उद्योग भवन ते कृष्ण मेनन मार्गादरम्यानचा ५, सुनहरी बाग बंगला पसंत केल्याची सूत्रांची माहिती आहे. लोकसभेचे पाचवेळचे खासदार आणि विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांना माजी केंद्रीय मंत्री डॉ. महेश शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील लोकसभेच्या आवास समितीने या बंगल्याची शिफारस केली आहे.

## जया बच्चन अन् रेखा आल्या समोरा समोर

मुंबई – हिंदी इंडस्ट्रीचे महानायक अमिताभ बच्चन यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अनेक गोष्टी नेहमीच चर्चेत



असतात. अमिताभ बच्चन यांची पत्नी जया बच्चन आणि अभिनेत्री रेखा यांनी एकाच फ्रेममध्ये पाहणं फार दुर्लभ आहे.दोघींनी अनेक सिनेमांमध्ये एकत्र काम केलं आहे. पण वैयक्तिक आयुष्यात काही कारणांमुळे त्या फार कधी एकत्र आल्याचं पाहायला मिळालं नाहीये. अमिताभ बच्चन आणि रेखा यांच्या अफेअरमुळे दोघी कधीच एकत्र आल्या नाहीत असं म्हटलं जातं. पण एक क्षण असा होता जेव्हा या दोघींनी एकमेकांना मिठी मारून आनंद साजरा केला होता.अमिताभ बच्चन यांना पीकू सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा अवॉर्ड घोषित करण्यात आला. त्यावेळी जया बच्चन आणि रेखा तिथे उपस्थित होत्या. रेखा या जया बच्चनपासून दूर बसल्या होत्या. पण जेव्हा अमिताभ यांना पुरस्कार घोषित करण्यात आला तेव्हा अभिनेत्री रेखा यांनी धावत येऊन जया बच्चन यांना मिठी मारली होती.जया बच्चन आणि रेखा यांचा थ्रो बॅक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यात फिल्ममेकर सुभाष घई सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी रणवीर सिंहबरोबर अमिताभ बच्चन यांचं नाव घेतात. बिग बी अवॉर्ड घेण्यासाठी मंचावर जातात आणि इथे जया बच्चन आणि रेखा एकमेकींना मिठी मारतात.

सूर्योदय

रविवार २८ जुलै २०२४

संपादकीय

# प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा

ज्या प्रवेश परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या आरोपांवरून संसदेपर्यंत घमासान चर्चा झडल्या, त्या यंदाच्या 'नीट' परीक्षेबाबतचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी जाहीर केला. यंदाची 'नीट' रद्द होणार नाही आणि पुन्हा घेतलीही जाणार नाही,' हे न्यायालयाने स्पष्ट केले. 'नीट'च्या निकालात गैरप्रकार झाले किंवा पूर्ण यंत्रणेचेच पद्धतशीर उल्लंघन झाले, असा निष्कर्ष काढण्याएवढा सबळ पुरावा नाही,' असे न्यायालयाचे म्हणणे. ही परीक्षा दिलेल्या देशभरातील २० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या मनातील अनिश्चितता या निकालाने निकालात काढली. किंबहुना फेरपरीक्षा घेतल्यास त्याचा या विद्यार्थ्यांना फटका बसेल, असे न्यायालयाचेच निरीक्षण आहे. काही ठिकाणी पेपरफुटी झाल्याचे स्पष्ट झाले असले आणि त्यामुळे परीक्षेवर शंका घ्यायला वाव असला, तरी प्रामाणिकपणाने परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या त्यापेक्षा किती तरी जास्त असणार आहे. शिवाय, पेपरफुटी व्यापक होती, असेही सिद्ध होत नसल्याने पुन्हा नव्याने सगळी प्रक्रिया पार पाडणे फारच जिकिरीचे होऊन बसले असते. वैद्याकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या वेळापत्रकावर परिणाम होऊन पुढे यंदाच्या शैक्षणिक वर्षालाच बसू शकणारा फटका, आरक्षण असलेल्या विद्यार्थ्यांची होऊ शकणारी गैरसोय, भविष्यात वैद्याकीय व्यावसायिकांच्या उपलब्धतेवर होऊ शकणारा परिणाम आदी मुद्दे निरीक्षणांच्या स्वरूपात न्यायालयानेच मांडले आहेत. परिणामी, आला तो निकाल योग्यच.मात्र, या निकालामुळे परीक्षा व्यवस्थेबाबत निर्माण झालेले प्रश्न संपलेले नाहीत. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी न्यायालयाच्या निकालावर दिलेली प्रतिक्रिया ही त्या दृष्टीने तपासायला हवी. 'विरोधक विद्यार्थ्यांची दिशाभूल करत होते,' वगैरे म्हणणे राजकीयदृष्ट्या एक वेळ ठीक, पण 'विरोधक अराजक माजविण्याचा प्रयत्न करत होते, त्यांनी देशाचा अपमान केला आहे,' अशी पुष्टी जोडणे आततायीपणाचे. 'नीट' पुन्हा घेण्यात यावी, या याचिकेवरील सुनावणीदरम्यान यंदाच्या 'नीट'मध्ये झालेल्या गैरप्रकारांवर पुरेसा प्रकाश पडलेला असताना आणि तो केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागासारख्या केंद्र सरकारच्या अखत्यारीतीलच तपास संस्थेने मांडलेला असताना, त्याबाबत प्रश्न विचारणे हे विरोधकांचे कामच आहे. हजारीबागमध्ये पेपर फोडणाऱ्याने प्रश्नपत्रिका ठेवलेल्या शाळेच्या खोलीत प्रवेश करून तेथून प्रश्नपत्रिकेची छायाचित्रे काढून नंतर त्या प्रती कशा वितरित केल्या, याची साद्यांत माहिती केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानेच मंगळवारच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात दिली आहे. अशा वेळी उपस्थित झालेल्या प्रश्नांवर समर्पक उत्तरे देण्याऐवजी शिक्षणमंत्र्यांनी अशी टिप्पणी करणे यातून एकूण परीक्षा यंत्रणेत सुधारणा करण्याचा मानस पुरेसा स्पष्ट होत नाही, हे उघड आहे.'नीट'मध्ये ६७ विद्यार्थ्यांचे पैकीच्या पैकी गुण, १,५६३ विद्यार्थ्यांचे वाढीव गुण आणि वेगवेगळ्या राज्यांतून सापडलेले या परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडण्यात सहभागी असलेले आरोपी यामुळे परीक्षेवर गंभीर सावट होते. सुनावणीदरम्यान वाढीव गुण रद्द करून ते मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घ्यावीच लागली. ती ज्यांनी दिली नाही, त्यांचे वाढीव गुण कमी झाले आणि ज्यांनी दिली, त्यानंतर पैकीच्या पैकी गुण मिळविणाऱ्यांची संख्या ६७ वरून ६१ झाली! त्याचप्रमाणे अन्य एका प्रश्नाच्या योग्य उत्तरासाठी तज्ज्ञांची समितीही नेमावी लागली. एकीकडे 'नीट'वर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना, या परीक्षेचे संचालन करणाऱ्या राष्ट्रीय चाचणी संस्थेनेच यूजीसी-नेट ही परीक्षा गैरप्रकार झाल्याच्या शंकेमुळे पुढे ढकलली होती. या सर्व बाबी परीक्षा यंत्रणेत असलेल्या गंभीर त्रुटी स्पष्ट करणाऱ्या आणि त्या वेळीच दुरुस्त करण्यासाठी पावले उचलण्याची गरज अधोरेखित करणाऱ्या आहेत. 'नीट'मधील घोळापाठोपाठ पुढे आलेल्या प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्या प्रकरणामुळे 'यूपीएससी'सारख्या संस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित राहिले आहे. अशा वेळी कोणत्याही स्पर्धा परीक्षेची प्रामाणिकपणे तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व काही पारदर्शकपणे पार पडेल, याचा दिलासा देण्याची जबाबदारी सरकारची आहे, हे सरकारने विसरू नये. विरोधकांनीही लक्षात घेण्याचा एक मुद्दा. 'एक देश, एक परीक्षा' हे सूत्र संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार असतानाच पुढे आले होते आणि त्यातूनच 'नीट' ही वैद्याकीय पदवी अभ्यासक्रमांसाठीची एकमेव प्रवेश परीक्षा असेल, असे ठरविण्यात आले होते.

# मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचं महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेकडून जाहीर अभिनंदन.

पेण प्रतिनिधी :

स्वप्नील म्हात्रे. अनेक वर्षानंतर महाराष्ट्रातील पोल्ट्री व्यवसायिकांचे बरेच प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याबद्दल महाराष्ट्राचे महसूल मंत्री मा.ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांचे महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेतर्फे जाहीर अभिनंदन करून आभार व्यक्त करण्यात आले आहेत. मंत्री विखे पाटील यांनी वेळोवेळी मदत करून पोल्ट्री व्यवसायिकांना वेळात वेळ काढून पुणे पशुसंवर्धन आयुक्त तसेच मंत्रालय येथे बैठका लावून त्यांचे प्रमुख प्रश्न व येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यातील अनेक समस्यांचे निवारण करून त्याचे प्रशासकीय आदेश काढायला लावले. पोल्ट्री व्यवसायातील समस्या पाहून मंत्री विखे पाटील साहेबांनी महाराष्ट्र कुक्कुटपालन समन्वय समिती स्थापन केली. या समितीत काही पशुसंवर्धन खात्यातील प्रशासकीय अधिकारी सदस्य म्हणून नेमण्यात आले यामुळे पोल्ट्रीधारक शेतकऱ्यांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी हक्काचे राज्यस्तरीय शासकीय व्यासपीठ उपलब्ध झालं. याचा फायदा खूप झाला.



या समन्वय समितीच्या माध्यमातून कोंबडी खाद्याच्या गोणीवरती त्यात समाविष्ट असलेल्या घटकांची छपाई क्रमप्राप्त करणे, दोन ते अडीज किलो वजनाचे चिकन खाण्यासाठी योग्य आहे असा अहवाल देणे, पोल्ट्री शेडवरील ग्रामपंचायत कर कमी करून त्यांच्या रजिस्टर च्या जाचक अटी शिथिल करणे अशा बऱ्याच गोष्टींचे समाधान करून शासकीय आदेश काढण्यासाठी मदत केली.ङ्ग तसेच यानंतर ग्रामविकास मंत्री व ऊर्जामंत्री यांच्या सोबत महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर व पदाधिकारी यांच्या बैठका लावून ग्रामपंचायत

कर सवलत व इलेक्ट्रिक बिल व सौर ऊर्जा पॅनल सवलत योजना सारखे प्रश्न लवकरच मार्गी लावण्यासंदर्भात वचन दिले आहे.

महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा ही शेतकरी संघटना अल्पवाधितच नावारूपाला आलेली प्रामाणिक पोल्ट्रीधाराकांची संघटना आहे. या संघटनेचे महाराष्ट्रभर ९ लाखाहून सदस्य आहेत. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील अनिल खामकर हे या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. त्यांच्यासोबत विलास साळवी, शरद गोडांबे, नंदू चौधरी, सर्जेराव भोसले, प्रकाश लसणे, दीपक पाटील हे व अन्य राज्य व जिल्हा पदाधिकारी तसेच समन्वय समिती सदस्य सुदर्शन पोकळे हे या संदर्भात अग्रेसर काम पाहतात.

आजवर प्रशासनातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून कोंबडी उद्योग क्षेत्रातील व्यावसायिक कंपन्या मनमानी करत होत्या. त्यामुळे पोल्ट्री व्यावसायिक सततच्या नुकसानाला व कर्जबाजारीपणाला कंटाळून पोल्ट्रीशेड बंद करत होते. पण या संघटनेमुळे पोल्ट्री व्यवसायकांना दिलासा मिळून, कंपन्यांची मक्तेदारी मोडून बॅच अखेर दोन पैसे जास्तीचे मिळू लागलेत. हे या संघटनेचे यश आहे.

त्यातूनच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांनी या महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा या संघटनेच्या माध्यमातून मांडलेल्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष दिल्यामुळे व पशुसंवर्धन आयुक्तालय पुणे या कार्यालयामार्फत चांगल्याप्रकारे प्रतिसाद लाभल्याबद्दल त्यांचेही खूप आभार ९ लाख शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत.सर्व सामान्य तरुण पुन्हा

या क्षेत्राकडे अपेक्षेने पाहू लागलाय. यातच या संघटनेची योग्य दिशा दिसून येत आहे. या जाणीवेमुळे महाराष्ट्रभरातून पोल्ट्री व्यवसायिकांकडून महाराष्ट्राचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचं कौतुक होत आहे. अखेर शेवटी बोलताना अध्यक्ष अनिल खामकर यांनी महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेतील ९ लाख सदस्य पोल्ट्रीधारक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेबांसोबत आहोत अशी प्रतिक्रिया दिली.

# आंबेडकरी बहुजन चळवळीतील अग्रगण्य नेतृत्व हरपले अमर रहे अमर रहे, रिपब्लिकन कोकण नेते व्हि. के. जाधव अमर रहे च्या घोषणांनी आसमंत दणाणले

कोकण नेते व्हि. के. जाधव यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन चळवळीची मोठी हानी

पाली /बेणसे दि. (धम्मशील सावंत )रिपब्लिकन चळवळीतील स्वाभिमानी नेते, ज्येष्ठ समाजसेवक, बहूजनांचे आधारवड असलेले नागोठणे येथील ज्येष्ठ कोकण नेते वसंत कृष्णा उर्फ व्हि. के. जाधव यांचे ७८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने आंबेडकरी बहुजन आणी धम्म चळवळीची अपरिमित हानी झालीय. त्यांच्या पच्छात पत्नी नंदा जाधव, मुलगा संजय जाधव, मुलगी मंगल व मनीषा तर सुन संध्या जाधव तसेच जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.ङ्गङ्ग निस्वार्थी आणी स्वाभिमानी बाण्याने त्यांनी आपले जीवन समाज , राष्ट्र आणी देशहितासाठी समर्पित केले. बहुजन महापुरुष, महानायिका यांचे लढावू, क्रांतिकारी, परिवर्तनवादी विचार घराघरात तळागळात पोहचविण्याचे त्यांनी हयात भर काम केले. आंबेडकरी चळवळीतील पक्ष, धार्मिक संघटना, निळ्या झेंड्याशी ते सतत प्रामाणिक राहिले. हजारो तरुणांना आंबेडकरी चळवळीशी जोडून अन्याय अत्याचारा विरोधात लढण्याची त्यांनी प्रेरणा दिली. अजातशत्रू म्हणून ओळख असलेले प्रेमळ आणि मनमिळावू स्वभावाचे व्हि. के. जाधव यांनी आंबेडकरी बहुजन



चळवळीला ताकत देण्याचे काम केले. ते एक उत्तम संघटक होते, ते अनेकांचे मदतगार आणि आधारवड होते. आपल्या संघटन कौशल्याने त्यांनी अनेक जिवाभावाची माणसे जोडली. रिपब्लिकन ऐक्यात त्यांनी मुख्य भुमिका बजावत आंबेडकरी नेत्यांना एकत्र आणण्यात त्याकाळी त्यावेळी ते यशस्वी ठरले होते, यातच त्यांच्या कर्तृत्वाची उंची सामावली आहे. महाराष्ट्रात आंबेडकरी चळवळ, धम्म चळवळ वाढीसाठी त्यांनी तन मन धनाने योगदान दिले आहे,

पुरोगामी आणी परिवर्तवादी चळवळ मजबूत व बलाढ्य होण्यात त्यांच मोठं योगदान राहिले आहे. अडीअडचणीत संकटात सापडलेल्या प्रत्येकाला त्यांनी मदतीचा हात दिलाय. सामाजिक सलोखा ऐक्य बंधूत्व राखण्यात ते नेहमीच पुढाकार घेत. लोकशाही आणी संविधानाच्या रक्षणासाठी व्हि. के. जाधव नेहमीच आग्रही आणी कृतिशील राहिले. आदिवासी, कष्टकरी, श्रमिक, गरीब गरजू बहूजणांची मुले शिकली पाहिजेत यासाठी त्यांनी सर्वोतोपरी योगदान दिले. सेवाभावी वृत्तीने ते हजारोच्या मदतीला धावून जातं असत. सर्वांच्या सुखदुःखात त्यांची हजेरी असायची. त्यांनी नेहमीच साधेपणा जपला, त्यांचा करारी बाणा पाहण्यासारखा होता. व्हि. के. जाधव यांच्या रूपाने आंबेडकरी चळवळीतील कोहिनुर हिरा हरपला आहे. राजकीय, सामाजिक चळवळीकरिता त्याग, समर्पण आणी दानशूर पणा जपणारे नेतृत्व काळाच्या पडद्या आड गेल्याने चळवळ पोरकी झाल्याची भावना अंत्य यात्रेस उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरानी व्यक्त केली. ङ्गयावेळी ज्येष्ठ आंबेडकरी नेते लक्ष्मण भगत, कामगार नेते रमेश जाधव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, रिपाइं रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, माजी नगराध्यक्ष मोहन अवसरमल, प्रकाश गायकवाड, सीताराम कांबळे, पांडुरंग जाधव,प्रा. सुनिल देवरे, वसंत केदारी,

विकास गायकवाड, नगरसेवक पांडुरंग जाधव, राहुल डाळिंबकर, चंद्रकांत गायकवाड, एस. एन. गायकवाड, संतोष गायकवाड, प्रकाश जाधव, अनिल वाणी, राहुल सोनावळे,ङ्गअमित गायकवाड, उद्योजक प्रकाश बिनेदार, डॉ. सुनील पाटील,प्रा. विजय चव्हाण, डॉ .अशोक साबळे, प्रा.अंकुश सोहनी,प्रा. श्रीकृष्ण तुपारे, प्रा. बबन झेंडे, प्रा.प्रेम आचार्य,माजी नगरसेवक जनार्दन जाधव, पत्रकार धम्मशील सावंत, यशवंत शिंदे, रमेश शिंदे, विकास शिंदे, विकास जाधव , विलास गोळे,मारुती देवरे, बाळा टके, सिराज पानसरे, माजी सरपंच निलोफर पानसरे , सुनीता बिनेदार, संजय रुपवते ,

काशिनाथ दाभाडे, दीपक दाभाडे, नथुराम गायकवाड, नरेश गायकवाड , ज्ञानदेव खंदारे,प्रभाकर गायकवाड,नितीन गायकवाड, प्रभाकर ओव्हाळ, दिलीप जाधव, संदीप मोहिते, रवींद्र मोहिते सर, किरण गायकवाड,राजेंद्र वाघमारे,राजेश वाघमारे, राजेश गायकवाड, प्रकाश गायकवाड,अनंत जाधव, हरींचंद्र गायकवाड, मधुकर गायकवाड,बौद्धचार्य नारायण जाधव, किसन शिर्के, विलास कांबळे, अंकुश कांबळे, मयूर गायकवाड, रामचंद्र देवरे, आदिसह मान्यवर, भीम अनुयायी, बहुजन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत व्हि. के. जाधव यांचा पुण्यानुमोदन आणी शोकसभा रविवार दिनांक ०४ ऑगस्ट २०२४ रोजी वांगणी शांतिदूत फार्म हाऊस येथे पार पडणार आहे.

# लक्ष्मण कुथे यांचे आकस्मिक निधन

नागोठणे -: नारायण म्हात्रे

झोतिरपाडा, ता. पेण येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण कमळ्या कुथे यांचे गुरूवार दि. २५ जुलै २०२४ रोजी पहाटे ०५:२० वा. राहत्या घरी वयाच्या ७५ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले आहे. लक्ष्मण कुथे हे शिहू विभागात सामाजिक कार्यात सूख दुःखात नेहमी सहभागी असायचे, त्यांनी काही काळ नागोठणे येथील रिलायन्समध्ये नोकरी सुध्दा केली आहे.

खूप प्रेमळ स्वभावाचे असणारे लक्ष्मण कुथे यांच्या निधनाने कुथे परिवाराचे फार मोठे नुकसान झाले आहे.

त्यांचे दहावे शनिवार दि. ०३/०८/२०२४ रोजी अंबा नदी किनारी झोतिरपाडा, ता. पेण येथे होतील. तसेच उत्तर कार्य तेरावे मंगळवार दि. ०६/०८/२०२४ रोजी मु.झोतिरपाडा (राहत्या घरी), ता. पेण, जि. रायगड येथे होतील याची समस्त नातेवाईक यांनी नोंद घ्यावी असे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले.

त्यांच्या पाठीमागे पत्नी, पुत्र नरेश, भास्कर, राजेंद्र, सुधीर कन्या भारती, सुरेखा, कमळा सुना, नातवंडे असा परिवार आहे.



# गणेशोत्सवानिमित्त कोकणात सहा विशेष गाड्या

मुंबई : यंदा ७ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव असून दोन दिवस आधीच कोकणात जाण्यासाठी गणेशभक्तांची लगबग सुरू होते. कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी पश्चिम आणि कोकण रेल्वे मार्गावर आणखी सहा विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मध्य आणि कोकण रेल्वेवरील विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा करून, त्यांचे तिकीट आरक्षण सुरू झाल्यानंतर काही मिनिटात प्रतीक्षा यादीची क्षमता पूर्ण झाली. तर, आता पश्चिम आणि कोकण रेल्वेवरून विशेष रेल्वेगाड्या सोडण्यात येत आहेत. गणपती विशेष रेल्वेगाड्यांपैकी गाडी क्रमांक ०९००२, ०९०१०, ०९०१६, ०९४११, ०९१४९ या पाच विशेष गाड्यांचे आरक्षण २८ जुलै रोजी सुरू होणार आहे.

गाडी क्रमांक ०९००१ मुंबई सेंट्रल ठोकूर (साप्ताहिक) विशेष तिकीट दरासह मुंबई सेंट्रल येथून दर मंगळवारी ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता सुटेल. तर, दुसऱ्या दिवशी सकाळी ८.५० वाजता ठोकूर येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०९००२ ठोकूर मुंबई सेंट्रल (साप्ताहिक) विशेष तिकीट दरासह ठोकूर येथून दर बुधवारी ४ सप्टेंबर, ११ सप्टेंबर, १८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता सुटेल. तर, दुसऱ्या दिवशी मुंबई सेंट्रलला सकाळी ७.०५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०९००९ मुंबई सेंट्रल सावंतवाडी रोड (आठवड्यातील ६ दिवस) विशेष तिकीटदरासह मुंबई सेंट्रल येथून सोमवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार आणि रविवार या दिवशी धावेल. २ ते १६ सप्टेंबर रोजी रात्री १२ वाजता सुटेल. तर, दुसऱ्या दिवशी दुपारी २.३० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहचेल. गाडी क्रमांक ०९०१० सावंतवाडी रोड मुंबई सेंट्रल (आठवड्यातील ६ दिवस) विशेष तिकीटदरासह सावंतवाडी रोडवरून मंगळवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार, रविवार आणि सोमवार या दिवशी धावेल. ३ ते १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.५० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी मुंबई सेंट्रलला रात्री ८.१० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०९४१२ अहमदाबाद कुडाळ (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह अहमदाबाद येथून ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी म्हणजे दर मंगळवारी सकाळी ०९:३० वाजता सुटेल. तर, दुसऱ्या दिवशी कुडाळला पहाटे ३.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०९४११ कुडाळ अहमदाबाद (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह कुडाळ येथून ४, ११ आणि १८ सप्टेंबर रोजी म्हणजे बुधवारी पहाटे ४.३० वाजता पोहचेल. दुसऱ्या दिवशी अहमदाबादला रात्री ११.४५ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०९१५० विश्वामित्री कुडाळ (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह विश्वामित्री येथून २, ९ आणि १६ सप्टेंबर रोजी दर सोमवारी सकाळी १० वाजता सुटेल. तर, दुसऱ्या दिवशी पहाटे ३.३० वाजता कुडाळला पोहचेल. गाडी क्रमांक ०९१४९ कुडाळ विश्वामित्री (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह कुडाळ येथून ३, १० आणि १७ सप्टेंबर रोजी पहाटे ४.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता विश्वामित्रीला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०९४२४ अहमदाबाद मंगळुरू (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह अहमदाबाद येथून ६, १३, २० सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सायंकाळी ७.४५ वाजता सुटेल. गाडी क्रमांक ०९४२३ मंगळुरु अहमदाबाद (साप्ताहिक) विशेष तिकीटदरासह मंगळुरु येथून ७, १४ आणि २१ सप्टेंबर सुटेल. तर, तिसऱ्या दिवशी पहाटे २.१५ वाजता पोहोचेल.





नागोठणे पत्रकार संघाचे सचिव महेंद्र माने यांचा ५४ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय भिसे, प्रसिद्धीप्रमुख रोशन पत्की, डॉ. अनिल गिते, नम्रता महेंद्र माने (वहीणी), नारायण म्हात्रे इत्यादी

# अस्तित्वावरच घाला

जगातील १७० देशांमध्ये आता मृत्युदंड दिला जात नाही. आपल्या देशातही संविधान निर्मितीच्या प्रक्रियेपासून त्यावर चर्चा सुरू आहे. मृत्युदंड देणे ही काळाच्या मागे नेणारी शिक्षा आहे, हा मुद्दा संविधान सभेतील चर्चांपासून सातत्याने मांडला गेला आहे;ब्रिटिशांनी २३ मार्च १९३१ रोजी भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना फासावर लटकवले आणि देशभर प्रक्षोभ उसळला. क्रांतिकारकांच्या मृत्यूचे दु:ख तसेच ब्रिटिश सरकारविरोधातील संताप निदर्शने, बंद आदी मार्गांनी व्यक्त होत असतानाच स्वतंत्र भारतात मृत्युदंडासारखी अमानुष शिक्षा असता कामा नये, याबाबतच्या सार्वत्रिक सहमतीला वेग आला. यानंतर आठवडाभरातच २९ मार्च १९३१ रोजी कराचीत झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात आपल्या देशात ‘देहांताची शिक्षा असणार नाही’ असा ठराव संमत झाला. ३० जानेवारी १९४८ रोजी बहुसंख्य भारतीयांना परम आदरणीय असलेल्या गांधीजींचा नथुराम गोडसेने खून केला आणि फाशीच्या विरोधातील सहमतीला खोलवर तडे गेले. गांधीजींचे कुटुंबीय तसेच इतरही अनेक लोक हे गांधीजी मृत्युदंडाच्या विरोधात होते हे लक्षात घेऊन नथुरामला दया दाखवावी अशी सरकारला विनंती करत होते. मात्र नथुरामला फासावर चढवा या मागणीचा जोर होता. गांधीजींचे शिष्योत्तम आणि राज्यकर्ते नेहरू-पटेल यांचे वैयक्तिक मत काहीही असले तरी जोवर आपल्याकडे देहान्ताची शिक्षा आहे आणि इतर गुन्हेगारांना ती दिली जाते आहे, तोवर गांधीजींच्या खुन्याबद्दल भिन्न विचार करता येणार नाही, अशी सरकारने भूमिका घेतली. गांधीजींची हत्या झाली तो काळ संविधान सभेच्या कामकाजाचा होता. या हत्येनंतर दहा महिन्यांतच संविधान सभेत सुरू झालेल्या मृत्युदंडाच्या चर्चेवर याचा प्रभाव पडणे स्वाभाविक होते.२९ नोव्हेंबर १९४८ रोजी झेड. एच. लारी यांनी ११- बी हा नवा अनुच्छेद संविधानात समाविष्ट करणारी दुरुस्ती संविधान सभेत मांडली. ‘हिंसेचा समावेश असलेला राजद्रोह वगळता अन्य गुन्ह्यांमधील मृत्युदंड रद्द करण्यात येत आहे’ अशी ही दुरुस्ती होती. तिचे समर्थन करताना आजमितीस जगातील ३० देशांनी मृत्युदंड रद्द केल्याचे लारी नमूद करतात. मृत्युदंड का नको याबाबतची लारी यांनी नोंदवलेली कारणे अशी न्यायाधीश किंवा न्यायाधीकरण चूक करू शकतात. ही शिक्षा झाल्यावर ज्याला शिक्षा दिली ती व्यक्ती संपते. काही काळाने असे लक्षात आले की जिला मृत्युदंड दिला ती व्यक्ती निर्दोष आहे. अशा वेळी ही चूक दुरुस्त करणे मानवी शक्तीच्या अधीन राहत नाही. ज्या देशांनी मृत्युदंड समाप्त केला आहे, तेथील गेल्या किमान दहा-वीस वर्षांचा अनुभव सांगतो की, ही शिक्षा रद्द केल्याने तिथे गुन्ह्यांत वाढ झालेली नाही.लारी यावर ‘जन्मठेपे’चा पर्याय सुचवतात. ते म्हणतात, ‘‘या काळात गुन्हेगारांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊ शकतो आणि त्यांच्यात सुधारणा होऊ शकते. कोणत्याही शिक्षेत हे सुधारणेचे तत्त्व सर्वाधिक महत्त्वाचे असते आणि त्याचाच मुख्यत्वे विचार व्हायला हवा.’’ राज्याच्या अस्तित्वावरच घाला येतो आणि अनेकांच्या प्राणांवर बेतण्याची वेळ येते अशा गुन्ह्यांत मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद ते तूर्त अपवाद म्हणून कबूल करतात. तथापि, आगामी दोन-तीन वर्षांत हाही अपवाद न करता मृत्युदंड संपूर्णतया नष्ट करण्याचा निर्णय संसद करू शकेल, अशी आशा व्यक्त करतात.लारींच्या या दुरुस्तीवर दुसऱ्या दिवशी ३० नोव्हेंबर १९४८ ला चर्चा सुरू झाली. या दुरुस्तीला आपला तत्त्वत: विरोध नसल्याचे सांगून अमिय कुमार घोष यांनी संविधानातील तिच्या समावेशाला मात्र विरोध केला. यामुळे राज्याचे हात कायमचे बांधले जातील,

गरज पडली तरी ते अशी शिक्षा देऊ शकणार नाही, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. समाजात सगळेच चांगले लोक नसतात, त्यात वाईटही असतात हे लक्षात घ्यायला हवे. समाजात दहशत निर्माण करणाऱ्या दुष्टांना अशी शिक्षा राज्य देऊ शकले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. मात्र मृत्युदंड कायमस्वरूपी असावा असे त्यांचे मत नाही. समाज जाणिवांच्या पातळीवर प्रगल्भ व विकसित झाल्यावर अशा शिक्षांबाबतच्या धोरणाचा राज्याने पुनर्विचार करावा. तथापि, तशी दुरुस्ती संविधानात न करता भारतीय दंड संहितेत किंवा तत्सम कायद्यांत करावी, अशी त्यांची सूचना होती.के. हनुमंतय्या यांनी लारींच्या सूचनेला स्पष्ट विरोध केला. ते म्हणतात, ‘‘दुसऱ्याचा जीव घेणाऱ्या माणसाला खात्री असेल की त्याच्या जिवाला काही अपाय होणार नाही, केवळ तुरुंगवास भोगावा लागेल, तर शिक्षेच्या प्रतिबंधात्मक स्वरूपाचे मूल्यच बहुधा नष्ट होईल. हल्ली सर्वसाधारणपणे सात-साडेसात वर्षांतच जन्मठेपेची शिक्षा झालेल्याला सोडले जाते. खून करणाऱ्या माणसाला सात-आठ-दहा वर्षांनंतर सुटकेची खात्री दिसली, तर हर कोणाला त्याच्या त्याच्या मार्गाने सूड घ्यायला प्रोत्साहन मिळेल. उदाहरणादाखल आपण गोडसे प्रकरण घेऊ’’‘गोडसे’ हा उल्लेख करताच सभागृहाचे कामकाज चालवणाऱ्यांनी उपाध्यक्ष हनुमंतय्यांना रोखले आणि ‘‘विशिष्ट व्यक्तीचा उल्लेख इथे करू नये’’ अशी सूचना केली. पुढे नाव न घेता हनुमंतय्या बोलले असले, तरी त्याला गांधीजींच्या खुनाचा संदर्भ आहे, हे सहज कळते.

आपल्या निवेदनाचा शेवट करताना ते म्हणाले, ‘‘कोणी व्यक्ती एखाद्या महत्त्वाच्या वा थोर माणसाचा खून करण्याच्या प्रयत्नात असेल आणि तिला सात किंवा आठ वा दहा वर्षांत मुक्त होण्याची खात्री असेल, तर आपल्या कृत्याची पुनरावृत्ती करायला ती कचरणार नाही.’’यानंतर लारींची ही दुरुस्ती अधिकृतपणे फेटाळली गेली. तथापि, अन्य मुद्द्यांच्या चर्चेप्रसंगी सदस्य याबाबतची आपली मते व भावना संविधान सभेत मांडत राहिलेले दिसतात. ३ जून १९४९ रोजी सर्वोच्च न्यायालयात करावयाच्या अपिलांबाबतच्या चर्चेत हस्तक्षेप करताना त्या संबंधातल्या विशिष्ट तरतुदी करण्याऐवजी ‘‘मृत्युदंडच नष्ट करायला माझा पाठिंबा राहील’’ असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले. आपल्या म्हणण्याचे समर्थन ते पुढीलप्रमाणे करतात,

# समाज व शिक्षण

माणुस हा समाजशिल प्राणी आहे. समाजाशिवाय तो राहु शकत नाही, मुल जेव्हा लहान असते तेव्हा त्याला कुटुंबात प्रेम मिळते, त्याच्या सर्व गरजा कुटुंबात पूर्ण होतात. मात्र जसजसे मुल वाढु लागते तसतसे त्याच्या सामाजिक गरजा हि वाढु लागतात.ङ्गसमाजात वावरत असताना



त्याला समाजाकडुन मिळणारी कौतुकाची थाप व त्या मुलाच्या अंगी असणाऱ्या गुणा व गुणांच्या निंदेतुन मुल कुंभाराच्या मडक्या प्रमाणे घडत असते, कुभांर जसा मातीच्या गोळ्याला थापुन - थापुन त्यापासुन सुंदर असा माठ बनवितो त्याच प्रमाणे मुलही कुटुंब व समाजात घडत असते, मुल जेव्हा समाजात वावरते त्यातुनच त्याचे खरे शिक्षण चालु असते. खरे काय.. ? खोटे काय..? याची जाणीव त्याला समाजातुनच होते. समाज हा एक उत्तम शिक्षक आहे..ङ्ग२० ते २५ वर्षापूर्वी जेव्हा मुल समाजात वावरत असे तेव्हा त्याला समाजाकडुन काय करावे.. ? काय करू नये, कसे वागावे.. ? याचे ज्ञान दिले जायचे किंवा ते आपोआप त्याला समाजातुन अवगत व्हायचे. मात्र आज आपण पाहतोय की, मुल हे फक्त कुटुबांत पोशित होत आहे. या तंत्रज्ञानाच्या युगात मुल हे मोबाईल व टी. व्ही. यात व्यस्त असल्याने वरील सर्व प्रकारच्या सामाजिक शिक्षणापासुन ते मुल वंचित राहत आहे.ङ्गआजकाल पालकही आपल्या मुलांना घरातच बसवुन ठेवण्यात धन्यता मानतात, हा प्रकार मोठ्या प्रमाणात शहरात पाहावयास मिळतो. जो पर्यंत मुल समाजात मिसळत नाही तो पर्यंत मुलांचा सर्वांगीण विकास होणे अशक्य असते.. मुलाच्या शारीरिक, भावनिक, मानसिक, बौध्दिक विकासाबरोबरच त्याचा सामाजिक विकासही खुप महत्वाचा असतो.ङ्गसमाजात वावरत असताना काही वेळा काही गोष्टी घातकही ठरू शकतात. मात्र केवळ याच एका गोष्टीचा विचार करून जर आपण मुलाला समाजापासुन दूर ठेवत असू ते त्या मुलाच्या सर्वांगिण विकासास मारक ठरणारे आहे..ङ्गसमाज हा एक उत्तम शिक्षक आहे. समाजात पूर्वी वागावे कसे.. ? बोलावे कसे...? कपडे कोणते परिधान करावे.. ? याबाबत शिकवण मिळत असे. मात्र आज आपण समाजापासुन भावी पिढी वंचित राहील की काय.. ? अशी भिती वाटते.ङ्गशेवटी आगीतुन तावुन - सुलाखुन निघाल्या शिवाय सोन्याची शुद्धता कळत नाही. तशी समाजात वावरल्या शिवाय जीवनाचे खरे सार कळत नाही...ङ्गङ्गसौ. संगिता मन्मथ निरणे.ङ्गप्राथमिक शिक्षिकाङ्गरा. जि. प. प्राथमिक शाळा, नेवरळ. ता. म्हसळा. जि. रायगड.ङ्गपिन: ४०२ १०५ङ्गमो.नं. ९०११४९६२०३.

# तुटलेली घरे, पाण्याखाली गेलेले रस्ते, पूलही वाहून गेले.. पावसामुळे महाराष्ट्रात भयानक परिस्थीती

पुणे - सध्या महाराष्ट्रात सर्वत्र पाणीच पाणी दिसत आहे. रस्ते जलमय झाले आहेत, नद्या दुथडी भरून वाहत आहेत, बंधारे उघडले आहेत, गावे असोत की शहरे सगळीकडे पाणीच पाणी आहे. लोकांच्या



घरातही पाणी शिरले आहे.

लोक घरे सोडून सुरक्षित ठिकाणी जात आहेत. मुंबई, पुणे, कोल्हापूर, ठाणे, रायगड, सातारा, पालघर, गडचिरोली, सांगली, लातूर इत्यादी महाराष्ट्रातील असे जिल्हे आहेत जिथे परिस्थिती बिकट झाली आहे.

आर्मी, एनडीआरएफ, एसडीआरएफसह पोलीस पथके तैनात आहेत, जे पुरात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात व्यस्त आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः रिंगणात उतरले आहेत. पुरामुळे पुण्यातील बिकट परिस्थिती पाहता ते पुण्याला जात आहेत.महाराष्ट्रात गेल्या पाच दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. २४-२४ तास आकाशातून पाण्याचे थेंब पडणे थांबत नाही. राज्यातील प्रमुख नद्यांच्या पाण्याची पातळी धोक्याच्या चिन्हावर गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सर्वच मोठ्या धरणांचे दरवाजे उघडण्यात आले असून, त्यामुळे शहरांसह गावांमध्येही पाणी शिरत आहे.पुण्यातील मुसळधार पावसात काल रात्री तीन वाजता भिडे पुलाजवळील जेड बि/ज कॉम्प्लेक्सखाली विजेचा धक्का लागून १८ ते २५ वयोगटातील तिघांचा मृत्यू झाला. मृत हा त्याच्या एका स्टॉलवर काम करायचा. रात्री मुठा नदीतील पाण्याची पातळी वाढल्याने ते दुकानातून दुसऱ्या ठिकाणी जात असताना हा अपघात झाला.पुण्यात अतिवृष्टीमुळे आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला आहे.

पुणे ग्रामीणच्या लवासा सिटीजवळील मुळशी तालुक्यातील डोंगरावर बांधलेल्या दोन बंगल्यांवर गुरुवारी दगड कोसळले. एनडीआरएफच्या म्हणण्यानुसार बंगल्यात काही लोक अडकले असण्याची शक्यता आहे. मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे.

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २८ जुलै २०२४



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## कर्जत तालुक्यातील भिसेगाव येथे नाशिकच्या तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

कर्जत : जयेश जाधव

तालुक्यातील सालवड येथील एका महिलेची लटकलेल्या अवस्थेत मृतदेह सापडल्याची घटना ताजी असतानाच आज दि. २६ जुलै रोजी कर्जत शहरातील भिसेगाव येथील वेताळ मंदिराच्या समोरील वडाच्या झाडाला एका २८ ते ३० वर्षीय तरूणाने दोरानी गळफास घेतल्याची घटना समोर आली आहे. सदर तरूण हा नाशिक येथील राहाणारा असल्याचे व नाव अमित हेमंत तिवारी असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा कर्जत तालुका हादरला आहे. कर्जत नांगुर्ले आदिवासी वाडी येथील काही आदिवासी बांधव हे कामानिमित्त सकाळचे ९ ते ९.३० वाजण्याचे सुमारास भिसेगाव वेताळ देवस्थान या परिसरातून जात असताना, वेताळ देवस्थान परिसरातील असलेल्या वडाच्या झाडाला एक तरूण दोरीच्या साह्याने गळफास घेतलेल्या अवस्थेमध्ये दिसुन आला. सदर प्रकार हा त्यांनी भिसेगावातील त्यांच्या ओळखीच्या ग्रामस्थांना सांगितल्याने ग्रामस्थ यांनी भिसेगावाचे पोलीस पाटील संजय हजारे यांना माहिती दिली. पोलीस पाटील संजय हजारे यांनी सदर घटनेची खबर पोलीसांना दिली असता, कर्जत पोलीसांनी लागलीच घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाची पाहाणी करून सदर तरूणाचा लटकलेलेल्या अवस्थेतील मृतदेह ग्रामस्थांच्या मदतीने खाली उतरवून शवाविच्छेदनासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.ङ्गपोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर तरूण हा नाशिक येथील राहणारा असून त्याचे नाव अमित हेमंत तिवारी असल्याचे निष्पन्न झाले. सदर तरुण हा विवाहीत असून कौटुंबिक वादातून त्याने आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्याने आपल्या कुटुंबीयांना याबद्दलची माहिती दिली असून त्याचे कुटुंबीय नाशिकहून घटनास्थळी दाखल होत असल्याची माहिती समोर येत आहे. सदर घटनेचा तपास कर्जत पोलिस ठाण्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या अधिपत्याखाली पोलिस उप निरीक्षक सतीश शिंदे, पोलीस नाईक अविनाश कांबळे, पोलीस शिपाई आकाश राठोड, पोलीस शिपाई राहुल राठोड, पोलीस शिपाई संदीप माळी, पोलीस शिपाई रविंद्र लोहकरे हे करीत आहेत.



## पाऊस कमी होताच शेतकरयाचा फळबाग लागवडीकडे ओढा.

तळा कृष्णा भोसले.

सध्या पाऊस कमी झाला असल्याने कमी पाऊसातून शेतकरी आता फळबाग लागवडीकडे वळला आहे.

आता स्वदेस फाऊंडेशन, कृषी विभाग, त्याचबरोबर काही ठिकाणी पाणलोट समिती च्या माध्यमातून आंबा, काजू, यांची रोपे पुरविली जात आहेत. त्यांची लागवड पाऊस असल्याने थांबली होती. परंतु पावसाने थोडी अधुनमधून थोडी विश्रांती घेतल्याने शेतकरी धावपळ करीत त्याची लागवड करण्यात गुंतला आहे.

शेती बरोबर हा अधिक उत्पन्न देणारे असे कोकणातील फळबाग लागवड आहे. या लागवडीतूनशेतकरयाला रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरी मिळते. आणि झाडे जगवली तर आयुष्यात म्हातारपणी आपली फळ विक्री तुन पेन्शन सुरू रहाते त्यांच्या मुळे शेतकरी या लागवडकडे ववळलेला दिसत येतो.



## कुंडलिका नदिनी धोक्याची पातळी ओलांडली,गोवे गावात घरात पाणी शिरून लोकांचे मोठे नुकसान

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

गेले आठ दिवसापासून सतत पडत असलेल्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली असुन कुंडलिका नदीची उप नदि महिसदरा नदिनी धोक्याची पातळी ओलांडली असल्यामुळे पुराचे पाणी गोवे गावातील घरात शिरून जीवनावश्यक वस्तू भिजून मोठे नुकसान झाले. शिवाय या पाण्यामुळे सर्व रस्ता पाण्याखाली गेल्यामुळे नागरिकांच्या येण्या जाण्याचा मार्ग बंद झाला आहे.ङ्ग हवामान खात्याकडून देण्यात आलेल्या अंदाजानुसार आठ दिवस सतत पाऊस पडेल हा अंदाज खरा ठरला असुन कुंडलिका नदिनी धोक्याची पातळी ओलांडली कोलाड पाटबंधारे खात्याकडून दिलेल्या आकडेवाडी नुसार बुधवार दि.२४ जुलै २०२४ रोजी मध्यरात्री १.०० वाजता देण्यात आलेल्या आकडेवारी नुसार कुंडलिका नदीची इशारा पातळी २३ मिटर असुन धोक्याची २३.९५ होती ती ओलांडून २५ पर्यंत गेल्यामुळे, कोलाड रोहा रस्त्यावरील आंबेवाडी गौरी नगर,संभे, पाले खुर्द पाले बु. आंबेवाडी, नाना नानी पार्क,आंबेवाडी बाजारपेठेत पाण्याखाली गेली असुन येथील व्यापारी वर्गाचे ही मोठे नुकसान झाले आहे.ङ्ग तसेच गोवे गावातील नवीन गावठाण, बौद्ध वाडी, आदिवासी वाडी तसेच गोवे गावातील काही घरामध्ये पाणी शिरले असुन जीवनावश्यक वस्तूचे नुकसान झाले आहे.तर पाण्यात,ड्रम,कोंबडच्या,लाकडे पाण्यात वाहून गेली परंतु रात्री एक वाजल्यापासून पहाटे सहा वाजेपर्यंत येथील तरुणांनी प्रसंगावधान दाखवत असंख्य नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हळविण्यात आले तसेच महिसदरा नदीला संवरक्षण भिंत नसल्याने सर्व पाणी भातशेतीमध्ये घुसल्यामुळे भातशेती ही पाण्याखाली गेली यामुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाली आहे.यामुळे प्रशासनाकडून झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.यामुळे पुन्हा एकदा १९८९ व २००५ मधील आठवणी जाग्या झाल्या.



## केरळ आणि पं.बंगालच्या राज्यपालांना सुप्रीम कोर्टाची नोटीस

नवी दिल्ली, : केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये वर्षभरापासून ८ हून अधिक विधेयके मंजुरी अभावी प्रलंबित आहेत. याप्रकरणी दोन्ही राज्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.



सुप्रीम कोर्टाने दोन्ही राज्यांच्या राज्यपालांना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयात सरन्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्या. जेबी परडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणी दोन्ही राज्यांनी सांगितले की, राज्यपाल बिलांना मंजुरी न देण्याचे कोणतेही कारण देत नाहीत. केरळ सरकारच्या वतीने ज्येष्ठ वकील केके वेणुगोपाल न्यायालयात हजर झाले. पश्चिम बंगाल सरकारच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी आणि जयदीप गुप्ता यांनी युक्तिवाद केला. ते म्हणाले की जेव्हा जेव्हा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सूचीबद्ध होते तेव्हा राज्यपालांनी विधेयके राष्ट्रपतींकडे पाठवली.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये पंजाब आणि तामिळनाडू सरकारनेही अशीच याचिका दाखल केली होती. दोन्ही सरकारांनी राज्यपालांवर विधेयके रखडल्याचा आरोप केला होता. यानंतर सरन्यायमूर्तींनी कडक टीका केली होती. आपण जनतेने निवडून दिलेले नाही, ही वस्तुस्थिती राज्यपालांनी लक्षात ठेवावी, असे ते म्हणाले होते. अशा स्थितीत जनहितार्थ आणलेल्या विधेयकाला विलंब लावणे योग्य नाही असा युक्तीवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्यानुसार सुप्रीम कोर्टाने दोन्ही राज्यपालांना नोटीस बजावत उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिलेत.

## शिवसेना उ. बा. ठा. पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६४ व्या वाढदिवसा निमित्ताने शैक्षणिक साहित्य वाटप

द. रा. जि. प्रतिनिधी:

संतोष उध्दरकर.ङ्गङ्गम्हसळा: दि. २७ जुलै रोजी शिवसेना उ. बा. ठा. पक्षाचे पक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या ६४ व्या वाढदिवस निमित्ताने शिवसेना उ. बा. ठा.म्हसळा तालुका संघटनेच्या वतीने म्हसळा शहरातील रा. जि. प. केंद्र शाळा न. १, रा. जि. प. शाळा नेवरुळ, शाईन के.जी, रा. जि.प. ऊर्दू या शाळेतील विद्यार्थाना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी रा. जि. प. केंद्र शाळा न १ चे शा. व्य. अध्यक्ष शशिकांत शिर्के यांनी उपस्थित मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले, या कार्यक्रम ठिकाणी बोलताना माजी सभापती रविंद्र लाड यांनी सर्व प्रथम उध्दव ठाकरे यांना त्यांच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व मुख्यमंत्री असताना ठाकरे यांनी कोरोना काळात जनतेचे कशा पद्धतीने रक्षण करून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य पाऊले उचलली त्यामुळे उद्धव ठाकरे यांचा देशात सर्वोत्कृष्ठ मुख्यमंत्री म्हणुन गौरव झाला , तसेच निसर्ग चक्रीवादळा सारखे आस्मानी संकट येऊन श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड, माणगाव, गोरेगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांचे नुकसान झाले या मध्ये उध्दव ठाकरे यांनी नागरीकांना सावरण्याचे बळ दिले, त्यांना योग्य ती मदत कार्य पोहोचविले असे लाड यांनी मनोगतात बोलताना सांगितले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना त्याचा योग्य वापर करा व उद्याचे आदर्श विद्यार्थी घडा असे देखील लाड यांनी विद्यार्थांना सांगितले. या वेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी माजी मुख्यमंत्री व कुटुंब प्रमुख उध्दव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात उपस्थित माजी सभापती रविंद्र लाड, तालूका प्रमुख सुरेश कुडेकर, युवा सेना तालुका अधिकारी कौस्तुभ करडे, उप. तालुका प्रमुख राजाराम तिलटकर, शहर प्रमुख विशाल सायकर, उप. शहर प्रमुख दिपल शिर्के, विलास खेडेकर, शा. व्य. अ. शशिकांत शिर्के,उप, शा. व्य. अ. समिक्षा वेदक, मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, अंकुश नटे, जेष्ठ पत्रकार उदय कळस, नरेश विचारे,शौकत हाजवाने, फहाद पेणकर, जुनैद अधिकारी, नौमन वजगरे, निशा पाटील, म्हात्रे,तसेच विद्यार्थी,सर्व शिक्षकवृंद,व पालक उपस्थित होते.



## रा.जि.प.शाळा बापवन शाळेत शैक्षणिक साहित्यांचे वाटप.

बोर्लीपंचतन:-(कुणाल माळवदे)

श्रीवर्धन तालुकयातील रा.जि.प.शाळा बापवन येथे मा.नामदार श्री.उद्धवजी ठाकरे साहेब,माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा शिवसेनाप्रमुख यांच्या जन्मदिनाचे व शिक्षण सप्ताहाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.ङ्गसदर कार्यक्रमाला




बाबुराव चोरगे माजी सभापती पंचायत समिती-श्रीवर्धन, अविनाश कोळंबेकर शिवसेना श्रीवर्धन तालुका प्रमुख,दिपक देवकर तालुका संपर्क प्रमुख,गजानन कदम तालुका संघटक,संदीप रिकामे विभाग प्रमुख,शंकर गोपाळ काप,माजी अध्यक्ष मुंबई मंडळ,सहदेव भिकू करण माजी पोलीस पाटील,अरुण शिगवण शिवसेना संघटक श्रीवर्धन मतदार संघ,आरोही चव्हाण,वृषाली जाबरे,देवयानी जाबरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक मनोज माळवदे यांनी केले.तर आभार प्रदर्शन विभाकर सुर्वे यांनी केले.

मुंबई विभागीय कार्यालय पत्ता : बी विंग / फ्लॅट नंबर ३०९ , मारुती दर्शन, हनुमान चौक, लोकमान्य टिळक रोड, मुलुंड पूर्व, मुंबई - ४०००८१- अनुप फंड (आवृत्ती संपादक), निखिल गोळे (आवृत्ती सहसंपादक) , नयानिष गोळे : (आवृत्ती कार्यकारी संपादक)

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )